# पोहरा

ह. मो. मराठे

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**पोहरा**

ह. मो. मराठे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
ह. मो. मराठे
६०७, 'ओ' इमारत, पिनाक मेमरीज,
कोकण एक्स्प्रेसच्या गल्लीत, कोथरुड, पुणे- ३८
फोन नं. ०२०-२५४३७५३० मो.नं. : ९४२३०१३८९२

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ६५०/-

ज्याने मला शिक्षणाच्या मार्गावर
आणून सोडलं
तो माझा थोरला भाऊ
देवदास मोरेश्वर मराठे
ऊर्फ बाबल याला–

**– ह. मो. मराठे**

## *लेखकाचं प्रास्ताविक*

'पोहरा' हा 'बालकाण्ड'चा पुढला भाग आहे. 'बालकाण्ड'मध्ये मी माझ्या बालपणाची गोष्ट सांगितली होती. (तिला मी 'आत्मकहाणी' म्हणतो.) 'बालकाण्ड'चं चांगलं स्वागत झालं. साहित्याचे जाणकार समीक्षक आणि सर्वसामान्य वाचक अशा सर्वांनीच त्याचं अगदी मनापासून स्वागत केलं. केशवराव कोठावळे पुरस्कार, दमाणी पुरस्कार असे प्रतिष्ठित साहित्यिक पुरस्कारही 'बालकाण्ड'ला लाभले. अनेकांनी त्यावर लेख लिहिले. वाचकांची खूप पत्रं आली. गोव्यातील साखळीजवळच्या सुर्ल येथे 'कोकण मराठी परिषद' आणि 'गोमंतक मराठी अकादमी' यांच्या पुढाकाराने 'बालकाण्ड'विषयक एक दिवसाचं चर्चासत्र व साहित्य संमेलन झालं. गोवा विद्यापीठाने 'बालकाण्ड'चा अभ्यासक्रमात समावेश केला. 'बालकाण्ड' प्रसिध्द झाल्यानंतर मला अनेक ठिकाणी मुलाखतीसाठी बोलावण्यात आलं. मुंबई दूरदर्शनवरही मुलाखत झाली.

समीक्षक, वाचक, मुलाखती घेणारे एक प्रश्न हमखास विचारीत, तो असा 'बालकाण्ड'च्या शेवटी, तुमच्या शिक्षणाला सुरुवात झाल्याचं तुम्ही सांगितलं आहे. त्याच्या पुढला भाग लिहिणार का? 'बालकाण्ड'मधला 'हनू' लेखक, संपादक म्हणून नावारूपाला कसा आला हे जाणून घेण्याची आम्हाला उत्सुकता आहे.

मी उत्तर देताना म्हणे : पुढला भाग लिहायचा की नाही हे मी ठरवलेलं नाही. काही सूत्र जाणवलं, काही दृष्टिकोन सापडला तर लिहायचा विचार करीन. नाहीतर नाही. पुढला भाग लिहिलाच पाहिजे, असं नाही.

एकदा वाटलं-लिहायला तर सुरुवात करावी! लेखन चांगलं झालेलं नाही असं वाटलं, तर नाही छापायला द्यायचं. सक्ती कुणाची आहे?

थोडं थोडं लिहायला लागलो. मी 'बालकाण्ड'च्या पुढला भाग लिहायला लागलो आहे, असं समजल्याने दिवाळी अंकांच्या काही संपादकांनी त्यातली प्रकरणं प्रसिध्दीसाठी मागितली. दोन-तीन दिवाळी अंकांतून ती प्रसिध्दही झाली.

'बालकाण्ड' जून २००१ मध्ये प्रसिध्द झालं. 'पोहरा' कच्च्या स्वरूपात २००३ च्या अखेरीपर्यंत लिहून झालं. आता 'फेअर' करायला घ्यायचं, असं मनाशी ठरवता ठरवताच मी मुंबई सोडून पुण्याला आलो. स्थलांतराच्या त्या व्यापात चार-पाच महिने गेले. पुण्याला स्थिरस्थावर झालो आणि 'फेअर' लिखाणाला सुरुवात केली. ते पुष्कळसं संपवत आणलं. तेवढ्यात हृदयविकार उद्‌भवला. जुलै २००५ मध्ये बायपास

सर्जरी झाली. त्या आजारात चार-पाच महिने गेले. थोडं बरं वाटायला लागल्यावर 'फेअर' लेखन पूर्ण करून टाकलं.

हस्तलिखित प्रकाशकांकडे पाठवण्याआधी माझा मोठा भाऊ बाबल (देवदास मोरेश्वर मराठे) याच्याकडे वाचायला पाठवलं. त्याने माहितीच्या, तपशिलाच्या काही दुरुस्त्या सुचवल्या. त्या करून घेतल्या आणि २००५ च्या नोव्हेंबरच्या दरम्यान 'पोहरा'चं भलं मोठं बाड प्रकाशकाकडे पाठवून दिलं. काही दिवसांनी मी चौकशी केली तेव्हा ते म्हणाले, ''लगेचच छपाईचं काम सुरू करतो आहे.'' 'बालकाण्ड' जून २००१ मध्ये प्रसिध्द झालं. त्यानंतर ५-६ वर्षांनी 'पोहरा' प्रसिध्द होत आहे. 'बालकाण्ड'च्या सार्वत्रिक स्वागतामुळे उत्साह वाढूनही एवढा काळ मध्ये गेला!

'संपूर्ण रत्नागिरी जिल्हा' असा 'पोहरा'त उल्लेख आहे. रत्नागिरी जिल्हा बराच मोठा होता. अरबी समुद्र आणि सह्याद्री पर्वत यांच्या मधला लांबलचक पण चिंचोळा भूभाग म्हणजे कोकण. या कोकणचा बराच भाग रत्नागिरी जिल्ह्यात मोडे. पुढं बॅ. अंतुले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना या लांबलचक पसरलेल्या जिल्ह्याचं विभाजन होऊन सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी असे दोन वेगळेवेगळे जिल्हे करण्यात आले. आजचे हे दोन जिल्हे मिळून पूर्वी एकच रत्नागिरी जिल्हा होता.

सध्या १० वीची परीक्षा ही एस.एस.सी.ची परीक्षा असते. मी एसेस्सीला बसलो तेव्हा ती अकरावीची होती. ८ वी, ९ वी, १० वी आणि ११ वी अशी हायस्कूलची चार वर्षं असत. मी एस.एस.सी.ला बसलो त्याच वर्षी (१९६०) मे महिन्यात वेगळं मराठी भाषिक महाराष्ट्र राज्य स्थापन झालं. त्या आधी मुंबई राज्य (द्विभाषिक) होतं. संपूर्ण राज्याचं (बहुधा) एकच एस.एस.सी. बोर्ड होतं. एस.एस.सी.चे निकाल मुंबई राज्याच्या पातळीवर लागत.

'बालकाण्ड'मध्ये चित्पावनी भाषेचा वापर खूप आहे. 'पोहरा'मध्ये फक्त वडिलांच्या (काका) तोंडी ती येते. थोडीशी आमच्या तोंडी. कारण आम्ही मराठीकडे वळलो होतो. शाळा, पुस्तकं, वृत्तपत्रं, लिखाण सर्वत्र मराठीच आमच्या वापरात आली होती.

'पोहरा'मध्ये 'मालवणी'चा वापर खूप आहे. मालवण सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवणी ही सर्रास सर्वांच्या बोलण्यात असणारी लोकभाषा आहे. शाळेतली मुलं, कधी कधी शिक्षकसुध्दा वर्गात बोलताना मालवणीतच बोलत. 'पोहरा'चा पुष्कळसा कथाभाग मालवणात घडतो. म्हणून मालवणीचा वापर स्वाभाविकपणेच अधिक झाला आहे.

'बालकाण्ड'मध्ये आणि 'पोहरा'मध्येही झोळंबे (ता. दोडामार्ग, जिल्हा - सिंधुदुर्ग) येथील सामायिक जमिनीतील काही हिस्सा आमच्या वडिलांनी खरेदी केला

होता आणि ती जमीन आपल्याला मिळावी यासाठी ते कोर्टकचेऱ्या करीत होते, असा उल्लेख येतो. त्यांनी तो खरेदी व्यवहार केल्यानंतर जवळजवळ पाऊणशे वर्षांनी, माझ्या थोरल्या भावाने रमेश, संजय या आपल्या मुलांच्या, झोळंबे ग्रामस्थांच्या, इष्टमित्रांच्या आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीने कागदपत्रं शोधली. वडिलांनी घेतलेली दोन –तीन एकर जमीन (अर्थात पडीक, खडकाळ आणि विखुरलेली) आम्हा दोघा भावांच्या नावे झाली. ७–१२ च्या उताऱ्यावर आमची नावं लागली. मी अधिकृतपणे कोकणभूमीचा पुत्र झालो! आणि गोमंतकभूमीचा नातू!

'पोहरा' स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण आत्मकहाणी म्हणूनही वाचता येईल; पण वाचताना हा 'बालकाण्ड'च्या पुढला भाग आहे, हे वाचकांनी ध्यानात ठेवलं, तर त्यांना पूर्वीचे संदर्भ आठवतील. वाचकांच्या सोईसाठी 'बालकाण्ड'चा शेवटचा भाग मी येथे उद्धृत करीत आहे :

*काकांचं रागारागानं बडबडणं फार वाढलं तेव्हा मी भिऊन बाबलला विचारलं,*

*''काका, असं काय करतो हे?''*

*''त्याचं डोकं फिरणार आहे मरे पुन्हा. त्याची लक्षणं आहेत ही.''*

*चार–पाच दिवसांनी पुन्हा काका–बाबलचं भांडणं झालं. दोघेही आवाज तापवून एकमेकांना बोलले.*

*जेवता–जेवताच काका अर्धवट उठले पानावरून.*

*म्हणाले, ''हो में चाललो. मला नाय एठा रेहेवेचां.''*

*''कें जाणार सस तां आदी सांग मरे.''*

*''मष्णात जायन.'' काका म्हणाले, ''झोळमां से. सुर्ल से. झोळमेला गावी हिस्सो से. सामायिक जमिनीत वाटो से माजो. में धडेवाटप करनी घेसां. खोप बांधीन तेठा. पुन्ना उभा करीन ठिकाण पयलेसारखां. समजलोस कितां तू?'' थांबून म्हणाले, ''नायतर जायन नरसोबाचे वाडीला. माधुकरी मागनी रेहेन.''*

*त्यांनी भराभरा आपलं सामान शोधलं. एक दोन पंचे. त्यांनी बरोबर आणलेला तांब्या, देवांचे फोटो, गुरुचरित्राची पोथी.*

*आपल्या सामानाचं बोचकं बांधून ते तयार झाले.*

*पडवीत उभे राहिले.*

*मला म्हणाले, ''तूंय चल मरे. घे तुजां सामान. लंगोट्यो, पैरणी, चड्डी. घे सगळां. आंग पुसेचो पंचो घे. पाटी दप्तर ऱ्हेवदे एठाच. माजेबरोबर फिरताना कें हणारसे तुजी शाळा?''*

*मी माझ्या लंगोट्या गोळ्या केल्या. खुंटीवरून शर्ट, चड्डी काढली. टोपी काढली. दप्तराच्या पिशवीतून पाटी-पुस्तकं बाहेर काढून टाकली. पिशवी रिकामी करून घेतली. तीत लंगोट्या भरल्या, एक पैरण, एक चड्डी घातली. पंचा घातला, एक पैरण, चड्डी अंगात घातली. टोपी घातली. पिशवी हातात घेऊन पडवीवर येऊन उभा राहिलो.*

*''चल, जावया.'' काका म्हणाले. त्यांनी पायात जुती सरकवली.*

*बाबल सगळं बघत होता.*

*काका चालू लागले. मी पाऊल उचललं.*

*बाबलनं माझ्या हाताला धरून मला मागं खेचलं.*

*मोठ्यानं काकांना म्हणाला, ''तो तुजेबरोबर येव्वेचो नाय. तू तेला घेवनी जांव नाका. तुला कें जायवेंचा तां जा. मष्णात जा, नायतर स्मशानात; पण तो आता तुजेबरोबर येव्वेचो नाय.''*

*''मग कितां करणारसे तो?'' काकांनी वळून बघत विचारलं.*

*''तो शिकेल. तेचां थोडां तरी शिक्षण होयवे हवां. तू माझे आयुष्याचो एक सत्यानास केलोस तेवढो पुरे. आता त्येच्याय आयुष्याची वाट लाव नाकां. समाजलां?'' बाबल जोराने म्हणाला. काका यावर काही बोलले नाहीत. त्यांनी आपले घारे डोळे रोखून माझ्याकडे आणि बाबलकडे बघितलं. दात कराकरा वाजवले आणि वळून, आमच्याकडे पाठ करून चालू लागले. पाणंदीतून पुढे गेले. रस्त्यावर उतरले आणि चालू लागले. दिसेनासे झाले.*

*मी तसाच पडवीत उभा होतो. हातात माझ्या कपड्यांची पिशवी.*

*बाबल म्हणाला, ''आत जा. कपडे काढून ठेव खुंटीवर. पिशवीत पाटी पुस्तकं भर. शाळेत जा. मी दुकानात कपडे शिवायला जातो तसा जाईन संध्याकाळी. तू शाळेतून आलास की उफीट करून ठेव. अभ्यासाला बस. कुशान मला सांगितलंन आहे तुला व्हफापर्यंत शिकवायला. तेवढं मी करीन. व्हफा चांगल्या मार्कांनी पास झालास, तर तुला प्राथमिक शाळामास्तरची नोकरी मिळेल. ती धर आणि जा कुठं तो तुझ्या पोटामागं.'' मी आत आलो. दप्तराच्या पिशवीतले कपडे बाहेर काढले. पुन्हा दप्तर भरलं. बाहेर येऊन पडवीवर अभ्यासाला बसलो.*

'पोहरा'च्या या आधीच्या आवृत्त्या 'मॅजेस्टिक प्रकाशन'चे अशोक कोठावळे यांनी छापल्या होत्या. 'जनआवृत्ती'च्या स्वरुपात आता हे पुस्तक 'रिया पब्लिकेशन्स्'चे श्री. शितल मेहता छापत आहेत. याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

**पुणे ३८, १ मे २०१६** **– ह. मो. मराठे**

✦✦✦

# भाग – १

*(१९५२–१९५६)*

बाबल आणि मी.

म्हादेवभट अभ्यंकराच्या मांघरात आता आम्ही दोघेच राहू लागलो.

मांघर तसा लहानसाच. बाहेर पडवी. ती संपूर्ण उघडी. चारी बाजूंनी उघडी. भिंती नाहीत. म्हादेवभटाच्या घरालाही पडवी होती; पण तिला भिंती होत्या. बाळू महेश्वरच्या घरालाही पडवी होती. तिलाही भिंती होत्या. आमच्या मांघराची पडवी चारी बाजूंनी उघडी. पडवीच्या आत एक मोठी खोली. माजघराची. त्याच्या आत एक अरुंद, लांबट खोली. तिच्या एका कोपऱ्यात आमची चूल.

थोडं थोडं दिसू लागलं की, बाबल उठे. मला हाक मारी; पण मी लगेच उठत नसे. तो उठे. चुलीच्या खोलीतली कळशी घेऊन बाहेर जाई. ती कळशी विहिरीच्या काठावर नाहीतर दोणीजवळच्या पाथरीवर ठेवून नदीवर जाई. सकाळी उठून सगळ्यांनाच नदीवर नाहीतर मळ्यात जावं लागे. म्हादेवभटाच्या परड्यात गडग्याजवळ झापांचा संडास होता एक, पण तो वापरायची फक्त म्हादेवभटाची बायको. बयोची आई. आम्ही तिला वैनी म्हणू. पुरुषांनी उठायचं आणि नदीवर जायचं. आम्हीच नव्हे, आजूबाजूचे बरेचसे पुरुष सकाळी पर्साकडला नदीवरच जात. ज्यांच्या परड्यात झापांचाही संडास नसे त्या बायका मळ्यात जाऊन बसत. मळ्यात जायचं तर पाणी भरून तांब्या न्यावा लागे. नदीवर झाडंझुडपं असत. नदीचं पाणी असे. खारं पाणी, पण असे.

बाबल नदीवरून आला की, विहिरीवर हातपाय धुवी. राखुंडीने दात घाशी. तोंड धुवी. विहिरीभोवतीच्या परड्यात काही फुलझाडं होती. गोलगोल, लाल काटेरी फुलं फुलणारी जास्वंद, साधी लाल फुलं येणारी जास्वंद, तगर, कोरांटी. या झाडांवर फुलं फुललेली असत. ती सगळे काढीत. तात्या नातू काढी, महेश्वर अभ्यंकर काढी, बाबल नातू काढी, आमचा बाबलही काढी. सगळे थोडी थोडी फुलं काढून घेत. इतरांना ठेवीत. सगळ्यांनाच देवपूजेसाठी फुलं हवी असत. खळ्यात तुळशीची झाडं होती. त्यांची पानं काढीत. खळ्यात पारिजातकाचं झाडं होतं. मंदाराचं होतं. पावसाळ्यात पारिजातकाला खूप फुलं लागत. सगळं झाड पांढऱ्या, लाल देठाच्या लहान लहान फुलांनी भरून जाई, वारा आला, फांद्या हलल्या की, खळ्यात फुलांचा सडा पडे. मंदाराचं झाड उंच वाढलेलं. त्यालाही लालसर रंगाची, लांबट आकाराची फुलं लागत; पण ती जमिनीवरून हातानं

काढता येत नसत. वर चढून काढावी लागत. तात्या, बाबल, महेश्वर झाडावर चढून मंदाराची फुलं काढीत नसत. कधी कधी मी शाळेत जाण्याआधी मंदाराच्या झाडावर चढून फुलं काढून आमच्या बाबलला देत असे.

एका हातात फुलं, तुळशीची पानं, दुसऱ्या हातात ताज्या पाण्यानं भरलेली कळशी घेऊन स्तोत्र म्हणत बाबल ओल्या पंचाने मांघरात येई. मी निजलेलाच बघून मला पुन्हा हाक मारी.

म्हणे, ''अरे, ऊठ मरे हनू. सकाळ झाली. दिसायला लागलं. शाळेत जायचं ना? ऊठ. निजून नको ऱ्हाऊस.''

''हं!'' मी म्हणे आणि कूस बदली. पाय पोटाशी घेई. माझं अर्धं अंग खळग्यात गेल्याचं लक्षात येई; पण मी तसाच निजून राही. अर्धा खळग्यात, अर्धा खळग्याच्या बाहेर. मांघराच्या जमिनीवर खळगे खळगे पडलेले होते. तिथं कोणी नेहमी राहत नसे. म्हणून जमीन सपाट केलेली नसावी. झोळभ्याच्या घरी काका जमीन करीत. आधी घरातली जमीन थोडी खणून घ्यायची. तीत थोडी माती घालायची. नीट कालवून मळायची. खोऱ्यानं सपाट करायची. लाकडाच्या चोपण्यानं रोज सकाळी, संध्याकाळी चोपायची. वाळता वाळता ती सपाट होत जाई. मग शेणानं सारवून घ्यायची. घरातली करायची तशीच खळ्याची. गुराढोरांच्या वावरण्याने खळ्याच्या जमिनीला खळगे खूप पडत. ती सपाट करून घ्यावी लागे. म्हादेवभटाच्या मांघरात गुरंढोरं नव्हती; पण कायमचं असं कोणी राहतही नव्हतं. म्हणून जमीन केलेली नव्हती. म्हणून सगळीकडे खळगे खळगे पडले होते. निजलं की अर्धं आंग खळग्यात, अर्धं बाहेर असं होई. आंगाला ओढ बसे; पण आम्ही तसेच निजत असू, अंथरायला अर्धा गोणता. पांघरायला काही लागतच नसे. पहाटेस थोडी थंडी वाजल्यागत होई; पण पाय पोटाशी घेतले की, तेवढी ऊब पुरे होई.

बाबलने दुसरी हाक मारल्यानंतरही मी पाय पोटाशी घेऊन निजूनच राही. मला हाक मारून बाबल चुलीच्या खोलीत जाई. त्यानं तिथं ताम्हनात फुलं ठेवलेली मला समजे. त्याचं स्तोत्र कुठपर्यंत म्हणून झालं ते समजे.

चुलीच्या खोलीत एका भिंतीला एक कोनाडा होता. त्यात आता बाबलने आपले देव मांडले होते. एक लाल, लांबट आकाराचा दगड. तो नर्मदेतला गणपती. एक दत्ताचा फोटो. एक गुरुचरित्राची पोथी. ती आता त्यानं स्वतःसाठी नवी आणली होती. काकांनी जाताना आपले देव आपल्याबरोबर नेले होते. त्यांची गुरुचरित्राची पोथी, त्यांची अध्यात्म रामायणाची पोथी, वाडेश्वराचा फोटो, रामेश्वराचा फोटो, काशी विश्वेश्वराचा फोटो. असं सगळं ते बोचकं बांधून घेऊन गेले होते. देवांचा कोनाडा रिकामासा दिसत होता.

बाबलने तिथं आपले देव मांडून ठेवले.